**आकाशवाणी नागपूर**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ०९ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

- **ऑगस्ट क्रांती मैदानातून राज्यव्यापी हर घर तिरंगा अभियानाला आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरुवात- या अभियानाला लोकचळवळ बनविण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन.**
- **आदिवासींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी दिनाचा उपयोग व्हावा- मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांचं प्रतिपादन; राज्यासह विदर्भात आदिवासी दिवस जल्लोषात साजरा.**
- **राष्ट्रीय शेअर बाजाराच्या विशिष्ट नोंदणीकृत गुंतवणूकदारांच्या संख्येनं पहिल्यांदाच ओलांडला १० कोटींचा टप्पा.**
- **लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी राजकीय पक्षांनी मतदार साक्षरता आणि प्रमाण वाढण्यासाठी समन्वय साधण्याचं विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांचं आवाहन.**

****

ऑगस्ट क्रांती

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या भारत छोडो आंदोलनात भाग घेतलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहिली. हा स्वातंत्रलढ्याच्या चळवळीला कलाटणी देणारा महत्वपूर्ण दिवस, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. देश भ्रष्टाचार, घराणेशाही आणि तुष्टीकरण यापासून मुक्त असावा ही भावना या चळवळीच्या माध्यमातून दृढ झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईतल्या ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदानात क्रांतिकारकांच्या हुतात्मा स्मृती स्तंभावर अभिवादन केलं. ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त आज गडचिरोली येथील स्वांतत्र्य संग्राम सैनिक मारोतराव नरोटे यांच्या स्तंभाला अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार डॉ.नामदेव उसेंडी, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## मुख्यमंत्री-घरोघरी तिरंगा अभियान

घरोघरी तिरंगा अभियान हे देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्याग आणि बलिदानाची आपल्याला सतत जाणीव करून देईल. या अभियानानं आता लोकचळवळीच स्वरूप घेतल असून यावर्षीही राज्यातील अडीच कोटी घरावर तिरंगा फडकवला जाणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून राज्यव्यापी हर घर तिरंगा अभियानाला आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरुवात करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. भावी पिढीमध्ये देशभक्तीची भावना दृढ व्हावी या हेतूनं सुरु केलेल्या या अभियानात जनतेनं मोठ्या उत्साहानं सहभागी व्हावं असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.या अभियानात गावागावांत, शहरात रॅली, पदयात्रा, तिरंगा सेल्फी, स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार असे उपक्रम राबविण्यात येणार आहे. दरम्यान, नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयात आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी आज हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत कर्मचाऱ्यांना तिरंगा शपथ दिली. तर वर्धा जिल्ह्यात आज जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते बाईक रॅलीने हर घर तिरंगा मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्युरो वर्धा, च्या पुढाकारानं आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा सायकल रॅलीचे आयोजन 13 ऑगस्ट रोजी सकाळी 6 वाजता करण्यात आलं आहे. तर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लाखो स्वातंत्र्य सैनिकांनी प्राणाचं बलिदान दिलं आहे. त्यांच्या त्याग आणि बलिदानाचं स्मरण म्हणून घरोघरी तिरंगा अभियान राबवावं असं आवाहन भंडारा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केलं आहे.

## नॉन क्रिमिलेयर

नॉन क्रिमिलेयर संदर्भात सर्वोच्चन्यायालयानं दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती - जमाती प्रवर्गातल्या खासदारांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. अनुसूचित जाती - जमातींना क्रिमेलियर लागू होणार नसल्याचा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी खासदारांना दिला असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गात उपप्रवर्ग पाडता येऊ शकतात, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं गेल्या आठवड्यात दिला होता.

जागतिक आदिवासी दिन

आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीनं त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या दिवसाचा उपयोग झाला पाहिजे. जंगल टिकवण्याचं काम आदिवासी बांधवानी केलं, त्यामुळे पृथ्वीचं आरोग्य चांगलं राखता आलं असून, अश्या निसर्गप्रेमी आदिवासींचा गौरव करण्यासाठी आजचा दिवस असल्याचं प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी केलं. नंदुरबार इथं आयोजित राज्यस्तरीय आदिवासी कार्यक्रमाच्या समारोपीय भाषणात गावित यांनी आदिवासी जीवन आणि इतिहासाचा गौरव केला. आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना बोलीभाषेतून शिकवण्यासाठीच्या पुस्तीकेचं आज त्यांच्या हस्ते अनावरण केलं गेलं तसंच -आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी अर्ज करण्याची सुविधा सुलभ करणाऱ्या डिजीटल पोर्टलचं देखील त्यांनी लोकार्पण केलं. सहा महिन्यात राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या सर्व शासकीय आश्रमशाळा डिजीटल करण्याची तसंच चांगल्या शिक्षणासाठी सर्वोत्तपरी प्रयत्न करण्याची त्यांनी ग्वाही दिली. जागतिक आदिवासी दिनानिमित्त आज गडचिरोलीत रॅली काढण्यात आली. यात शेकडो आदिवासी महिला, पुरुष, युवक आणि युवती सहभागी झाले होते. तर गोंदिया जिल्ह्यात काढण्यात आलेल्या रॅलीत जिल्ह्यातील आदिवासी बांधव पारंपरिक पोशाख परिधान करून हजारोच्या संख्येने सामील झाले होते. आदिवासी बहुल नक्षलग्रस्त देवरी तालुक्यात आदिवासी दिनाच्या आयोजनात आदिवासी बांधवानी गोंडी नृत्य सादर करीत हा दिन साजरा केला. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा आणि सर्व आदिवासी सामाजिक संघटना भंडारा जिल्हा यांच्या तर्फे येत्या ११ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी गौरव दिन सोहळ्याचं आयोजन करण्यात येणार आहे.तर चंद्रपूर इथं कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता माहिती आणि मार्गदर्शन केंद्र, इथं शिकत असलेल्या उमेद्वारांसोबत उपजिल्हाधिकारी डी.एस.कुंभार यांच्या उपस्थितीत आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. नागपुरात देखील अनेक ठिकाणी आज आदिवासी दिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. नागपुरातील विधान भवन चौकातिल गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या पुतळ्याला विविध सामाजिक संघटनांच्या वतीनं पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं तसंच आदिवासी जननायक आणि नेत्यांची त्यांनी केलेल्या कार्याविषयी माहिती फोटो सहित प्रदर्शनी काढण्यात आली. आदिवासी आघाडी पश्चिम नागपूर, युवा आदिवासी शक्ती संघटन, जय जोहार आदिवासी महिला बचत गट यांच्या वतीनं रैलीचं आयोजन करण्यात आलं होत. अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय

आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नागपूर यांचा संयुक्त विद्यमान आज जागतिक आदिवासी दिनानिमित्त गुणगौरव सोहळा आणि विविध सांस्कृतिक कार्क्रमांचं आयोजन कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आलं होतं. आदिवासी विकास विभागांतर्गत येत असलेल्या शासकीय,अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य शाळा, शासकीय वसतिगृह आणि नामांकित शाळेतील वर्ग दहावी तसच बारावीतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस वितरण, पारंपारिक आदिवासी नृत्य इत्यादी कार्यक्रमांचं आयोजन यावेळी करण्यात आलं.

शेअर बाजार

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या विशिष्ट नोंदणीकृत गुंतवणूकदारांच्या संख्येनं पहिल्यांदाच १० कोटींचा टप्पा पार केला आहे. मार्च २०२१ मध्ये नोंदणीकृत गुंतवणूकदारांची संख्या ४ कोटीवर पोहोचली होती.हा आकडा गाठण्यासाठी २५ वर्षांचा काळ लागला होता. मात्र, त्यानंतर सुमारे ६ ते ७ महिन्यात पुढचे १ कोटी नोंदणीकृत गुंतवणूकदार जोडले गेले होते. तर, केवळ ५ महिन्यात गुंतवणूकदारांची संख्या ९ कोटीवरून १० कोटीवर पोहोचल्याचं, एन एस ई नं एका प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. डिजिटायझेशन,आर्थिक समावेशन आणि गुंतवणूकदारांची जागरूकता यामुळे ही संख्या झपाट्यानं वाढत आहे, असंही या पत्रकात म्हटलं आहे. या १० कोटी गुंतवणूकदारापैकी बहुसंख्य गुंतवणूकदार महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातले आहेत.

मतदार नोंदणी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदार संघात मतदार नोंदणी केली जात आहे. लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी विविध राजकीय पक्षांनी मतदार साक्षरता आणि  मतदान प्रमाण वाढावं यासाठी उचित समन्वय साधून कामास गती आणावी, असं आवाहन नागपूर विभाग मतदार निरीक्षक तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केलं .जिल्हाधिकारी कार्यालयात  बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. छायाचित्रासहित मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित प्रथम भेट अंतर्गत या बैठकीत आढावा घेण्यात आला. सुधारित कार्यक्रमानुसार 6 ते 20 ऑगस्ट  या कालावधीत नागरिकांकडून दावे आणि  हरकती मागविण्यात आल्या आहेत. यानुसार पात्र नागरिकांनी नवीन मतदार नोंदणी, दुरुस्ती,

वगळणी यासाठी विहीत नमुन्यात अर्ज करता येणार आहे. प्राप्त दावे आणि हरकतींचे 29 ऑगस्ट पर्यंत निराकरण करण्यात येणार आहे.

नागपंचमी

राज्यात अनेकठिकाणी आज नागपंचमीचा सण उत्साहात साजरा होत आहे. या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजा करण्याची पद्धत आहे. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. या मान्यतेमुळे आजच्या दिवसाला महत्व आहे. निसर्गातले सर्वच साप विषारी नसून, सापांविषयी समाजामध्ये पसरलेल्या विविध गैरसमजांबाबत, अनेक सर्पमित्र नागपंचमीच्या निमित्तानं जनजागृती करत असतात. यवतमाळ मध्ये एम एच २९ हेल्पिंग हॅन्ड वाईल्ड ऍडव्हेंचर अँड नेचर क्लबनं नागपंचमीचं औचित्य साधून जनजागृती रैली काढली. यात नागाची भव्य प्रतिमा लक्षवेधी ठरली. वन्यप्रेमी युवक युवतींनी हाती सापांविषयी माहिती देणारे फलक घेतले आणि पथनाट्य सादर करून सापांना न मारण्याचं आवाहन केलं.

पॅरिस ऑलिम्पिक

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत आज कुस्तीमध्ये पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात अमन सहरावत कांस्य पदकासाठी खेळणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री पावणे दहा वाजता हा सामना सुरु होईल. दरम्यान, पॅरिस ऑलिम्पिकच्या कालच्या दिवशी भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्रा यानं रौप्यपदकावर नाव कोरलं, तर पुरुष हॉकी संघानं कांस्यपदकाला गवसणी घातली.

हवामान

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांसह अमरावती इथं आज तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. दरम्यान 11, 12 आणि 13 ऑगस्ट रोजीविदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्यानं सतर्कतेचा यलो अलर्ट जरी करण्यात आला आहे.

****